नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाकरिता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व परिवहन उपक्रमाच्या आकृतीबंधास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक:- नमुंम-१२१८/प्र.क्र.१४२ (१)/नवि-२८
४ था मजला, मंत्रालय (मुख्य इमारत),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-३२.
दिनांक:- ११ जुलै, २०१९

वाचा:- १. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे पत्र क्र.नमुंमपा/परि/प्रशा/९११/२०१८, दि.१७.१२.२०१८.
२. परिवहन व्यवस्थापक, नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम, नवी मुंबई यांचे पत्र क्र.नमुंमपा/परि/प्रशा/९२०/२०१८, दि.२०.१२.२०१८.
३. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे पत्र क्र.नमुंमपा/परि/प्रशा/६५५/२०१९, दि.१४.०६.२०१९.

प्रस्तावना:-

नवी मुंबई महानगरपालिकेची स्थापना सन-१९९२ मध्ये झाली असून, नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाची सेवा दि.२३.०१.१९९६ पासून सुरू झालेली आहे. सद्य:स्थितीत परिवहन उपक्रम नवी मुंबईसह बृहन्मुंबई, ठाणे, डोंबिवली, बदलापूर, खारघर, कळंबोली, पनवेल, उरण अशा एकूण ७० विविध मार्गावर प्रवासी सेवा देत आहे. त्याद्वारे प्रतिदिन २.५ लाख प्रवाशांना वाहतुक सेवेचा लाभ होत आहे.

२. नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाने यापूर्वी सादर केलेल्या विविध प्रस्तावांच्या अनुषंगाने परिवहन उपक्रमाकरिता दि.२०.०७.२००६ व दि.३१.०८.२००९ च्या शासन निर्णयांन्वये एकूण १४८९ पदे मंजूर करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

३. नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे प्रशासकीय कामकाज, वाहतुक सेवेमध्ये दिवसेंदिवस होणारे बदल, आधुनिकीकरण व परिवहन सेवेमध्ये झालेली वाढ या बाबी विचारात घेता, नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाकरिता नवीन पदनिर्मिती करणे तसेच आकृतीबंध निश्चित करणे आवश्यक होते. त्यासाठी आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी संदर्भीय दि.१७.१२.२०१८ च्या पत्रान्वये नवीन पदनिर्मितीचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर केलेला आहे.

४. त्याअनुषंगाने मा.प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग यांच्याकडे दि.२९.०५.२०१९ रोजी बैठक झाली. सदर बैठकीत झालेल्या चर्चेनुसार प्रस्तुत प्रस्तावाच्या छाननीअंती नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या विविध विभागांकरिता नवीन पदांची निर्मिती करणे तसेच परिवहन उपक्रमाचा आकृतीबंध निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी संदर्भीय दि.१७.१२.२०१८ च्या पत्रान्वये सादर केलेल्या नवीन पद मंजुरीच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सदर शासन निर्णयासोबत जोडलेल्या **प्रपत्र-"ब"** मधील तक्त्यातील रकाना क्र.६ मध्ये नमूद करण्यात आलेली वर्ग-१, वर्ग-२ व वर्ग-३ ची एकूण १३५ पदे नव्याने निर्माण करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-३४६ (२) (अ) नुसार शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त नमूद १३५ नवीन पदे निर्माण करताना एकवेळची बाब म्हणून नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या ३५% आस्थापना खर्चाची अट शिथील करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

३. नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी दि.२०.०७.२००६ व दि.३१.०८.२००९ च्या शासन निर्णयांन्वये मंजूर करण्यात आलेल्या पदांमधील **प्रपत्र-"ब-३"** मध्ये नमूद विविध संवर्गातील १८ पदे या शासन निर्णयान्वये व्यपगत करण्यात येत आहेत.

४. इतर महानगरपालिकांच्या परिवहन सेवेतील पदांशी सुसंगती असण्याच्या दृष्टीने तसेच परिवहन उपक्रमातील पदांच्या सेवा प्रवेश नियमाच्या सुलभतेकरिता काही पदांची नावे तसेच वेतनश्रेणीतील बदल याबाबतचा तपशील सदर शासन निर्णयासोबत जोडलेल्या **प्रपत्र-“ब-१”** मध्ये दर्शविण्यात आला आहे. तसेच काही पदांच्या अन्य संवर्गातील समावेशनाबाबतचा तपशील **प्रपत्र-“ब-२”** मध्ये दर्शविण्यात आलेला आहे. त्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

५. नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या आस्थापनेवर **प्रपत्र-“अ”** प्रमाणे मंजूर १४८९ पदे व या शासन निर्णयान्वये **प्रपत्र-“ब”** प्रमाणे मंजूर १३५ पदे अशा एकूण १६२४ मंजूर पदांमधून, व्यपगत करण्यात येणारी **प्रपत्र-“ब-३”** प्रमाणे १८ पदे वगळता, नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाचा **प्रपत्र-“क”** प्रमाणे **एकूण १६०६ पदांचा** आकृतीबंध राहील.

६. नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाचा सदर आकृतीबंध पुढील अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे:-

(१) सदर शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्टातील पदे आवश्यकतेनुसार कमी जास्त प्रमाणात महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या आस्थापना खर्चाची टक्केवारी लक्षात घेऊन भरण्यात यावीत.

(२) नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या सुधारित आकृतीबंधामध्ये मंजूर केलेल्या पदसंख्येपेक्षा अधिक अधिकारी/कर्मचारी महानगरपालिकेत सध्या कायमस्वरुपी कार्यरत असतील तर, असे अधिकारी/कर्मचारी सेवेत असेपर्यंत किंवा पदोन्नत होईपर्यंत सदर पदे अस्तित्वात राहतील, तद्नंतर अशी पदे आपोआप व्यपगत होतील.

(३) नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या ज्या सेवा बाह्यस्त्रोतांद्वारे (Out Sourcing) करणे शक्य व आवश्यक आहे, अशा सेवा बाह्यस्त्रोतांद्वारे (Out Sourcing) करण्यात याव्यात.

७. परिवहन व्यवस्थापक, नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम यांनी परिच्छेद क्र.६ मधील अटी व शर्तींचे पालन करून सुधारित आकृतीबंधाच्या अनुषंगाने पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१९०७१११४५९३१९४२५ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Navnath
Ravaji Wath

Digitally signed by Navnath Ravaji Wath
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=885bfbac1d8ef74e3ffe622f226b31d75c2a13f319632f0da72fd54e57ac00ff, serialNumber=30e05bf6f1ed11d82b5689c9fc6b47a271a6b22790a9388dba7f3db15e247ff5, cn=Navnath Ravaji Wath
Date: 2019.07.15 17:35:41 +05'30'

(नवनाथ रा. वाठ)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत:- प्रपत्र-**“अ”**, **“ब”**, **“ब-१”**, **“ब-२”**, **“ब-३”** व प्रपत्र-**“क”**

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.
३) महापौर, नवी मुंबई महानगरपालिका, जि.ठाणे.
४) आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका, जि.ठाणे.
५) परिवहन व्यवस्थापक, नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम, नवी मुंबई.
६) मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) प्रधान सचिव (नवि-२) यांचे स्वीय सहायक, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) कार्यासन अधिकारी (नवि-१४), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) निवडनस्ती (नवि-२८).

शासन निर्णय क्र.नमुंम-१२१८/प्र.क्र.१४२(१)/नवि-२८, दि. ११ जुलै, २०१९ सोबतचे

प्रपत्र-"अ"

नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या मंजूर पदांचे शासन निर्णय

अ.क्र.	शासन निर्णय क्रमांक व दिनांक	मंजुरी देण्यात आलेल्या पदांची संख्या
१	**२**	**३**
१	नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.२००३/३१९३/ प्र.क्र.४६/०४/नवि-२८, दि.२०.०७.२००६	१४०७
२	नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.नमुंमपा-१२०८/१४१/ प्र.क्र.१११/०८/नवि-२८, दि.३१.०८.२००९	८२
एकूण		**१४८९**

****

शासन निर्णय क्र.नमुंम-१२१८/प्र.क्र.१४२(१)/नवि-२८, दि. ११ जुलै, २०१९ सोबतचे

प्रपत्र-"ब"

नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी नवनिर्मित पदांचा तपशील

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी (रुपये)	ग्रेड पे (रुपये)	शासन मंजूर पदसंख्या	नवनिर्मित पदांची संख्या	एकूण पदसंख्या (५+६)
१	**२**	**३**	**४**	**५**	**६**	**७**
१	कार्यकारी अभियंता (यांत्रिकी)	१५६००-३९१००	६६००	०	१	**१**
२	कार्यकारी अभियंता (स्थापत्य)	१५६००-३९१००	६६००	०	१	**१**
३	उप अभियंता (यांत्रिकी)	१५६००-३९१००	५४००	१	१	**२**
४	उप अभियंता (स्थापत्य)	१५६००-३९१००	५४००	०	१	**१**
५	मुख्य वाहतुक अधिकारी	१५६००-३९१००	५४००	०	१	**१**
६	कामगार कल्याण व विधि अधिकारी	९३००-३४८००	४६००	०	१	**१**
७	वाहतुक अधिक्षक	९३००-३४८००	४६००	१	२	**३**
८	मुख्य सुरक्षा अधिकारी	९३००-३४८००	४४००	०	१	**१**
९	कार्यालय अधिक्षक	९३००-३४८००	४३००	०	७	**७**
१०	कनिष्ठ अभियंता (विद्युत)	९३००-३४८००	४३००	०	१	**१**
११	सहाय्यक वाहतुक अधिक्षक	९३००-३४८००	४३००	५	१	**६**
१२	भांडारपाल	९३००-३४८००	४२००	०	३	**३**
१३	प्रमुख मेकॅनिक	५२००-२०२००	२८००	०	३	**३**
१४	मेकॅनिक, दर्जा-१	५२००-२०२००	२४००	३	११	**१४**
१५	वाहतुक नियंत्रक	५२००-२०२००	२४००	६०	१००	**१६०**
	एकूण			**७०**	**१३५**	**२०५**

****

शासन निर्णय क्र.नमुंम-१२१८/प्र.क्र.१४२ (१)/नवि-२८, दि. ११ जुलै, २०१९ सोबतचे

प्रपत्र-"ब-१"

नावात/ग्रेड पे मधील बदल करावयाच्या पदांचा तपशील

अ.क्र.	पदाचे नाव	वेतनश्रेणी	पदसंख्या	नवीन पदाचे नाव	सुधारित वेतनश्रेणी
१	२	३	४	५	६
१.	परिवहन व्यवस्थापक	रु.१५६००-३९१०० (ग्रेड रु. ६६००)	०१	**परिवहन व्यवस्थापक**	**रु.१५६००-३९१०० (ग्रेड रु.७६००)**
२.	चालक प्रशिक्षक	रु.५२००-२०२०० (ग्रेड पे रु.२४००)	०१	**चालक प्रशिक्षक**	**रु.५२००-२०२०० (ग्रेड पे रु.२८००)**
३.	वाहक प्रशिक्षक	रु.५२००-२०२०० (ग्रेड पे रु.२४००)	०१	**वाहक प्रशिक्षक**	**रु.५२००-२०२०० (ग्रेड पे रु.२८००)**
४.	वरिष्ठ लिपिक	रु.५२००-२०२०० (ग्रेड पे रु.२४००)	०२	**वरिष्ठ लिपिक (लेखा)**	**रु.५२००-२०२०० (ग्रेड पे रु.२४००)**
५.	कनिष्ठ लिपिक टंकलेखक	रु.५२००-२०२०० (ग्रेड पे रु.१९००)	३०	**लिपिक टंकलेखक**	**रु.५२००-२०२०० (ग्रेड पे रु.१९००)**
६.	कनिष्ठ लिपिक टंकलेखक	रु.५२००-२०२०० (ग्रेड पे रु.१९००)	०४	**लिपिक (लेखा)**	**रु.५२००-२०२०० (ग्रेड पे रु.१९००)**
७.	स्वच्छता कामगार	रु.४४४०-७४४० (ग्रेड पे रु.१३००)	०२	**शिपाई**	**रु.४४४०-७४४० (ग्रेड पे रु.१३००)**

****

शासन निर्णय क्र.नमुंम-१२१८/प्र.क्र.१४२ (१)/नवि-२८, दि. ११ जुलै, २०१९ सोबतचे

प्रपत्र-"ब-२"

समायोजन करावयाच्या पदांचा तपशील

अ.क्र.	पदाचे नाव	वेतनश्रेणी	पदसंख्या	समायोजित करावयाच्या पदाचा तपशील	
				पदाचे नाव	वेतनश्रेणी
१	२	३	४	५	६
१.	डेटा एंट्री ऑपरेटर	रु.५२००-२०२०० (ग्रेड पे रु.२४००)	०३	**वरिष्ठ लिपिक**	**रु.५२००-२०२०० (ग्रेड पे रु.२४००)**
२.	वाहन तपासणीस	रु.५२००-२०२०० (ग्रेड पे रु.२४००)	०८	**वाहतुक नियंत्रक**	**रु.५२००-२०२०० (ग्रेड पे रु.२४००)**
३.	सहाय्यक आगार व्यवस्थापक	रु.९३००-३४८०० (ग्रेड पे रु.४३००)	०१	**सहायक वाहतुक अधिक्षक**	**रु.९३००-३४८०० (ग्रेड पे रु.४३००)**
४.	सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक	रु.९३००-३४८०० (ग्रेड पे रु.४३००)	०५	**कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी)**	**रु.९३००-३४८०० (ग्रेड पे रु.४३००)**

****

शासन निर्णय क्र.नमुंम-१२१८/प्र.क्र.१४२ (१)/नवि-२८, दि. ११ जुलै, २०१९ सोबतचे

प्रपत्र-"ब-३"

व्यपगत करावयाच्या पदांचा तपशील

अ.क्र.	पदाचे नाव	पदसंख्या
१	**२**	**३**
१.	कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी)	०४
२.	कनिष्ठ लिपिक टंकलेखक	०२
३.	डेटा एंट्री ऑपरेटर	०२
४.	उप लेखापाल	०२
५.	अंतर्गत लेखा परीक्षक	०१
६.	कार्यशाळा उप व्यवस्थापक	०१
७.	रोखपाल	०१
८.	तिकीट व रोख अधिक्षक	०१
९.	लघुटंकलेखक (मराठी)	०१
१०.	चालक प्रशिक्षक	०१
११.	वाहक प्रशिक्षक	०२
एकूण पदे		**१८**

****

प्रपत्र "क"

नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाचा विभागवार आकृतीबंध

(१) परिवहन व्यवस्थापक कार्यालय

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी (रुपये)	ग्रेड पे (रुपये)	शासन मंजूर पदसंख्या	नवनिर्मित पदांची संख्या	एकूण पदसंख्या (५+६)
१	२	३	४	५	६	७
१	परिवहन व्यवस्थापक	१५४००-३९१००	७६००	१	०	१
२	लघुलेखक (निम्नश्रेणी) (मराठी/इंग्रजी)	९३००-३४८००	४२००	१	०	१
३	वरिष्ठ लिपिक	५२००-२०२००	२४००	१	०	१
४	लिपिक टंकलेखक	५२००-२०२००	१९००	१	०	१
५	शिपाई	४४४०-७४४०	१३००	२	०	२
एकूण				६	०	६

(२) प्रशासकीय विभाग

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी (रुपये)	ग्रेड पे (रुपये)	शासन मंजूर पदसंख्या	नवनिर्मित पदांची संख्या	एकूण पदसंख्या (५+६)
१	२	३	४	५	६	७
१	कर्मचारी व प्रशासन अधिकारी	९३००-३४८००	४६००	१	०	१
२	कामगार कल्याण व विधि अधिकारी	९३००-३४८००	४६००	०	१	१
३	कार्यालय अधिक्षक	९३००-३४८००	४३००	०	७	७
४	वरिष्ठ लिपिक	५२००-२०२००	२४००	७	०	७
५	लिपिक टंकलेखक	५२००-२०२००	१९००	११	०	११
६	शिपाई	४४४०-७४४०	१३००	२	०	२
एकूण				२१	८	२९

(३) लेखा विभाग

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी (रुपये)	ग्रेड पे (रुपये)	शासन मंजूर पदसंख्या	नवनिर्मित पदांची संख्या	एकूण पदसंख्या (५+६)
१	२	३	४	५	६	७
१	मुख्य लेखा व वित्त अधिकारी	१५६००-३९१००	५४००	१	०	१
२	लेखा अधिकारी	९३००-३४८००	४६००	२	०	२
३	सहाय्यक लेखा अधिकारी	९३००-३४८००	४४००	३	०	३
४	उप लेखापाल	९३००-३४८००	४२००	४	०	४
५	वरिष्ठ लिपिक (लेखा)	५२००-२०२००	२४००	२	०	२
६	लेखा लिपिक	५२००-२०२००	१९००	४	०	४
७	शिपाई	४४४०-७४४०	१३००	२	०	२
एकूण				१८	०	१८

(४) अभियांत्रिकी विभाग

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी (रुपये)	ग्रेड पे (रुपये)	शासन मंजूर पदसंख्या	नवनिर्मित पदांची संख्या	एकूण पदसंख्या (५+६)
१	**२**	**३**	**४**	**५**	**६**	**७**
१	कार्यकारी अभियंता (यांत्रिकी)	१५६००-३९१००	६६००	०	१	**१**
२	कार्यकारी अभियंता (स्थापत्य)	१५६००-३९१००	६६००	०	१	**१**
३	उप अभियंता (यांत्रिकी)	१५६००-३९१००	५४००	१	१	**२**
४	उप अभियंता (स्थापत्य)	१५६००-३९१००	५४००	०	१	**१**
५	शाखा अभियंता (यांत्रिकी)	९३००-३४८००	४४००	२	०	**२**
६	कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी)	९३००-३४८००	४३००	६	०	**६**
७	कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)	९३००-३४८००	४३००	१	०	**१**
८	कनिष्ठ अभियंता (विद्युत)	९३००-३४८००	४३००	०	१	**१**
९	प्रमुख मेकॅनिक	५२००-२०२००	२८००	०	३	**३**
१०	मेकॅनिक, दर्जा-१	५२००-२०२००	२४००	३	११	**१४**
११	वरिष्ठ लिपिक	५२००-२०२००	२४००	३	०	**३**
१२	लिपिक टंकलेखक	५२००-२०२००	१९००	४	०	**४**
१३	मेकॅनिक, दर्जा-२	५२००-२०२००	१९००	४१	०	**४१**
१४	मदतनीस	४४४०-७४४०	१३००	४१	०	**४१**
१५	शिपाई	४४४०-७४४०	१३००	३	०	**३**
एकूण				**१०५**	**१९**	**१२४**

(५) वाहतुक व्यवस्थापन विभाग

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी (रुपये)	ग्रेड पे (रुपये)	शासन मंजूर पदसंख्या	नवनिर्मित पदांची संख्या	एकूण पदसंख्या (५+६)
१	**२**	**३**	**४**	**५**	**६**	**७**
१	मुख्य वाहतुक अधिकारी	१५६००-३९१००	५४००	०	१	**१**
२	वाहतुक अधिक्षक	९३००-३४८००	४६००	१	२	**३**
३	सहाय्यक वाहतुक अधिक्षक	९३००-३४८००	४३००	५	१	**६**
४	वाहतुक निरीक्षक	९३००-३४८००	४२००	११	०	**११**
५	चालक प्रशिक्षक	९३००-३४८००	४२००	१	०	**१**
६	वाहक प्रशिक्षक	९३००-३४८००	४२००	१	०	**१**
७	सहाय्यक वाहतुक निरीक्षक	५२००-२०२००	२८००	३३	०	**३३**
८	वाहतुक नियंत्रक	५२००-२०२००	२४००	६०	१००	**१६०**
९	वाहन चालक (जड)	५२००-२०२००	२०००	५५६	०	**५५६**
१०	वाहन चालक (हलके)	५२००-२०२००	१९००	६	०	**६**
११	वाहक	५२००-२०२००	१९००	६३४	०	**६३४**
१२	वरिष्ठ लिपिक	५२००-२०२००	२४००	२	०	**२**
१३	लिपिक-टंकलेखक	५२००-२०२००	१९००	१२	०	**१२**
१४	शिपाई	४४४०-७४४०	१३००	२	०	**२**
एकूण				**१३२४**	**१०४**	**१४२८**

(६) भांडार विभाग						
अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी (रुपये)	ग्रेड पे (रुपये)	शासन मंजूर पदसंख्या	नवनिर्मित पदांची संख्या	एकूण पदसंख्या (५+६)
१	२	३	४	५	६	७
१	भांडार अधिकारी	९३००-३४८००	४४००	१	०	**१**
२	भांडारपाल	९३००-३४८००	४२००	०	३	**३**
३	लिपिक-टंकलेखक	५२००-२०२००	१९००	१	०	**१**
४	शिपाई	४४४०-७४४०	१३००	२	०	**२**
एकूण				**४**	**३**	**७**

(७) सुरक्षा विभाग						
अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी (रुपये)	ग्रेड पे (रुपये)	शासन मंजूर पदसंख्या	नवनिर्मित पदांची संख्या	एकूण पदसंख्या (५+६)
१	२	३	४	५	६	७
१	मुख्य सुरक्षा अधिकारी	९३००-३४८००	४४००	०	१	**१**
२	लिपिक-टंकलेखक	५२००-२०२००	१९००	१	०	**१**
३	शिपाई	४४४०-७४४०	१३००	१	०	**१**
एकूण				**२**	**१**	**३**

****